# जाहिर आवाहन

अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजना राबविण्यास शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयानुसार कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील स्वमालकिची जागा असलेल्या, यापुर्वी शासनाच्या कोणत्याही घरकुल योजनेचा लाभ न घेतलेल्या, स्वतःचा निवारा नसलेल्या फक्त दारिद्र्य रेषेखालीली कुटूंबातील व्यक्ती कडून अर्ज मागविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत प्रथम टप्प्यात दारिद्र्यरेषेखालील कुटूंबाच्या यादीत समाविष्ट असलेल्या व निवारा नसलेल्या (झोपडी/कच्चे घर असलेल्या) अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील कुटूंबास लाभ देणेची निश्चिती करण्यात आलेली आहे.

## परिशिष्ट क

अर्जाचा अनुक्रमांक :-

## अनुसुचित जातीच्या व्यक्तींना वैयक्तिक घरकुलसाठी अर्ज

| | | |
|---|---|---|
| १. | अर्जदाराचे नांव | :- |
| २. | वडीलांचे संपूर्ण नांव<br>पतीचे नांव (महिलांसाठी) | :- |
| ३. | अ. कायमचा पत्ता<br>ब. सध्याचा पत्ता | :-<br>:- |
| ४. | अर्जदारास घरकुल बांधावयाचे असलेल्या जागेचा पत्ता | :- |
| ५. | घ्रकुल बांधावयाच्या जागेचा तपशिल क्षेत्रफळ इ. (सदर जागा स्वमालकीची असल्याबाबतचा तपशिल) | :- |
| ६. | अर्जदाराची जन्मतारीख व वय | :- |
| ७. | जन्मस्थळ | :- |
| ८. | जात व पोटजात | :- |
| ९. | शिक्षण | :- |
| १०. | अर्जदाराचा व्यवसाय | :- |
| ११. | रेशनकार्ड क्रमांक | :- |
| १२. | अर्जदाराच्या वडीलांच्या व्यवसाय<br>पतीचा व्यवसाय (महिलांसाठी) | :- |
| १३. | कुटूंबातील मिळवत्या व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न | :- |

मी प्रतिज्ञेवर असे लिहून देतो की, वरील सर्व माहिती सत्य आहे. माझ्या मालकीचे अन्यत्र कोठेही घर नाही. शासकीय अनुदानातून माझ्या जागेवर बांधण्यात आलेल्या घराचा मी स्वतः वापर करेन. इतरांना भाड्याने देणार नाही. सदर घर मी इतरांना हस्तांतरीत अथवा विकणार नाही. असे घडल्यास शासन सदर घर परत घेऊ श्केल व त्यास माझी संमती आहे.

दिनांक :-

अर्जदाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा

अर्जदाराचे नांव :-

## ✳योजनेच्या अटी व शर्ती✳

१. योजनेचे स्वरूप :- महानगरपालिका क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौध्द व्यक्तींना पक्की घरे बांधून देण्यात येतील. तसेच शासकिय अधिकरणामार्फत घर खरेदीस या शासन नियर्णाव्दारे विहीत घर किंमत मर्यादेत अनुदान उपलब्ध करून देण्यात येईल.

२. घराची किंमत मर्यादा :- घराच्या बांधकामासाठी क्षेत्रनिहाय कमाल खर्चाची मर्यादा पुढीलप्रमाणे आहे.
महानगरपालिका क्षेत्र - रू. २,००,०००/-

३. लाभार्थी हिस्सा :- महानगरपालिका क्षेत्र - रू. १० टक्के

४. घराचे क्षेत्रफळ :- घराच्या बांधकामाचे चटई क्षेत्र २६१ चौ. फुट राहील.
टिप :- शहरी भागामध्ये इतर विभागाच्या गृहनिर्माण योजनेप्रमाणे या योजनेसाठी देखिल ४ पर्यंत चटई क्षेत्र निर्देशांक (F.S.I.)मंजूर करण्यात येईल.

५. अ) पात्रता :-
१. लाभार्थी अनुसुचित/नवबौध्द जातीचा असावा.
२. लाभार्थ्याचे कोल्हापूर महानगरपालिका हद्दितील वास्तव्य किमान १५ वर्षे असावे.
३. अर्जदाराच्या कुटूंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा - महानगरपालिका क्षेत्र – रू. २.०० लक्ष
४. शक्यतो लाभार्थ्याची स्वतःची जागा असावी. अथवा त्याचे स्वतःचे कच्चे घर असलेल्या ठिकाणी घर बांधण्यात येईल.
५. सदर योजनेचा लाभ कुटूंबातील एकाच व्यक्तीस देण्यात येईल.
६. जमीन कमी उपलब्ध असेल तर त्या ठिकाणचे सर्व पात्र लाभार्थी मिळून (२ पेक्षा जास्त) एकत्रित बांधकाम (ग्रुप हाऊसिंग) करता येईल.
७. शासनाच्या इतर गृहनिर्माण योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

ब)आवश्यक कागदपत्रे :-
१. रेशनकार्ड / निवडणूक मतदार ओखळपत्र / विद्युत देयक
२. जमीन ताबापत्र पुरावा (७/१२ उतारा / मालमत्ता नोंदणी प्रमाणपत्र)
३. सक्षम प्राधिका-याचे दिलेले जातीचे प्रमाणपत्र
४. सक्षम प्राधिका-याने दिलेला उत्पन्नाचा दाखला
५. दारिद्रय रेषेखालील दाखला व इतर अन्य पुरावा.
टिप :- जमिनीच्या मालकी हक्काबाबतचा पुरावा (७/१२ उतारा / पी.आर. कार्ड) नसेल तर रेशनकार्ड / निवडणूक मतदान ओळखपत्र / विद्युत देयक ग्राह्य धरता येईल.

६. प्राधान्य क्षेत्र :- घरे बांधताना खालीलप्रमाणे प्राधान्य क्रम देण्यात येईल.
अ) जातीय दंगलीमध्ये घराचे नुकसान (आगीमुळे व इतर तोडफोड) झालेली व्यक्ती
ब) ॲट्रॉसिट ॲक्टनुसार पिडीत झालेल्या अनुसूचित जातीच्या पात्र व्यक्ती.
क) पुरग्रस्त क्षेत्र
ड) विधवा महिला
इ) उर्वरीत सर्व क्षेत्र

मनपा क्षेत्रात प्रथम प्राधान्याने लाभार्थीना स्वतः बांधकाम करण्याचे आहे. त्यासाठी लाभार्थ्यास अनुदान देणेत येईल. लाभार्थ्यांनी असमर्थता दर्शविल्यास महाराष्ट्र गृह निर्माण क्षेत्र विकास महामंडळ (म्हाडा) किंवा महानगरपालिकेने स्वतः बांधकाम करावे. अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत ज्यावेळी लाभार्थी म्हाडा किंवा महानगरपालिका यांची बांधकाम करणेची तयार

| | | |
|---|---|---|
| | | नसेल तर मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समितीने नियुक्त केलेल्या बांधकाम व्यावसायिक नामांकित संस्था / स्वंयसेवी संस्थामार्फत घराचे बांधकाम करणेत येईल. सदर संस्थाची निवड करण्यापूर्वी त्यास शासनाची मान्यता घेणे आवश्यक राहील. |
| ७. | अंमलबजावणी आणि आहरण व संवितरण अधिकारी :- | विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी हे आहरण व संवितरण अधिकारी राहतील. व नियंत्रक अधिकारी म्हणून संचालक, समाजकल्याण, पुणे हे राहतील. |
| ८. | अनुदान वितरण पध्दती :- | अ) घराचे बांधकाम सुरू करताना – ५० टक्के<br>ब) ५० टक्के निधीचे उपयोगीता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर – ४० टक्के<br>क) घराचा ताबा घेताना आणि सक्षम प्राधिका-यांनी पूर्णत्वाचा दाखला दिल्यानंतर – १० टक्के |

टिप :- अर्जदारास विहीत नमुन्यातील अर्ज झेरॉक्स, टंकलिखीत किंवा हस्तलिखीत स्वरूपात करता येईल.

अर्ज स्विकारण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ

<u>अर्ज सादर करण्याची ठिकाणे</u>

१. प्रकल्प संचालक, सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना,
कै. पोपटराव जगदाळे हॉल, राजारामपूरी १ ली गल्ली, कोल्हापूर.

२. उपशहर अभियंता, तथा नोडल ऑफीसर
विभागीय कार्यालय क्र.१.
वरूणतिर्थवेस, गांधी मैदान, कोल्हापूर.

दिनांक :- दि. १६/१२/२०११ ते दि. २२/१२/२०११.

वेळ :- सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.०० पर्यंत.